# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९३-२३** **दिनांक :- २१/०३/२०२३**

## मध्य प्रदेश राज्यातील खुनासहित दरोडाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपीतास अटक पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामिगिरी.

मध्यप्रदेश राज्यातील सिटी कोतवाली, जिल्हा सतना या पोलीस ठाण्याचे हद्दीत दिनांक ०६/०३/२०२३ रोजी दुपारी १३:४० वाजता ते १३:५० वाजताच्या सुमारास भाटीया वाईन ग्रुप कंपनीचे मालक संजय कुमार सिंह हे बँकेमध्ये त्यांचे कंपनीमध्ये जमा झालेली रक्कम भरण्याकरीता इको कारमधून जात असताना ते बरदाडीह रोड, सेंट्रल बँकेचे समोर, सतना, मध्यप्रदेश येथे आले असता अज्ञात आरोपीतांनी त्यांच्या ताब्यातील १५ लाख रु. रक्कमेची बॅग जबरीने काढून घेण्याचा प्रयत्न केला व त्यास त्यांनी प्रतिकार केला असता आरोपीतांनी संजय कुमार सिंह यांच्या पोटावर, पाठीवर व कानाचे जवळ गोळया मारुन जखमी केले व ते सोबत आणलेल्या मोटार सायकलवरुन पळुन गेले होते. सदर घडलेल्या घटनेबाबत सिटी कोतवाली पोलीस ठाणे, जिल्हा सतना, रा. मध्य प्रदेश येथे दिनांक ०६/०३/२०२३ रोजी गुन्हा नोंद क्रमांक १७४/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३९७, ३९५ सह भा.ह.का.कलम ३, २५ प्रमाणे २१:३७ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी हा पेल्हार पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात राहत असलेबाबत माहिती मिळाल्याने सिटी कोतवाली जिल्हा सतना, मध्यप्रदेश यांनी पोलीस मदत मागणी केल्यावरुन गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाची दोन पथके तयार केली व गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपीत निलेश जनार्दन यादव, वय २२ वर्षे, रा. मुळग्राम शहाबुद्दीनपुर, पो.ता. किराकत, जि. जौनपुर, राज्य उत्तरप्रदेश यांस ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास पुढील कारवाईकामी मध्य प्रदेश पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ २, वसई, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अंम संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, मोहसिन दिवाण यांनी केली आहे.

---ooo---